**महाराष्ट्र शासन**
**वनविभाग**
**मुख्य वनसंरक्षक, (प्रादेशिक) गडचिरोली यांचे कार्यालय.**
वन प्रशासकीय भवन, पोटेगांव रोड, गडचिरोली-४४२६०५ (महाराष्ट्र राज्य)
**दुरध्वनी क्रमांक ०७१३२-२२२१८४** Email-ccfgad@gmail.com

क्रमांक :- कक्ष-१(३)/आस्था/२०२४-२५/ 4435 गडचिरोली, **दिनांक** - 21/02/2025

**प्रति,**

संचालक, वनप्रबोधिनी चंद्रपूर
वनसंरक्षक, वाहतुक व विपणन बल्लारशाह
उप वनसंरक्षक (प्रादे.) आलापल्ली/ भामरागड/ सिरोंचा/ गडचिरोली/ वडसा
उप वनसंरक्षक, कार्य आयोजना विभाग, गडचिरोली
विभागीय वनअधिकारी, सामाजिक वनीकरण गडचिरोली/ वनसंवर्धन चंद्रपूर/ मुल्यांकन चंद्रपूर
उप विभागीय वनअधिकारी (वन्यजीव) विभाग आलापल्ली

**विषय :- एकस्तर वेतननिश्चीतीबाबत.**
एकस्तर पदोन्नती अंतर्गत वेतननिश्चीती जोडपत्र-III नुसार करण्याबाबत.

**संदर्भ :-** १) महसुल व वनविभाग, शासन पत्र क्रमांक एफएसटी-०२/२५/प्र.क्र.३२/फ-४, दिनांक २१/०२/२०२५
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन दुय्यम संवर्ग) नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१०(२)/आस्था/एक/प्र.क्र.१०८(२४-२५/)१४१५ दिनांक २१/०२/२०२५

*********

विषयांकीत प्रकरणी, सहाव्या वेतन आयोगात वनरक्षकांना एकस्तर पदोन्नतीची वेतन निश्चीती करतांना जोडपत्र-III नुसार ग्रेड पे समोरील वेतन निश्चीतीप्रमाणे वेतननिश्चीती करता येईल किंवा कसे, तसेच दिनांक ०३/०२/२०२३ ची अधिसूचना एकस्तर योजनेनुसार वेतननिश्चीतीचा लाभ देणेसाठी लागू होईल किंवा कसे, याबाबत मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन दुय्यम संवर्ग) नागपूर यांनी दिनांक १८/०२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये शासनास मार्गदर्शन मागविले होते.

सदर प्रकरणात शासन पत्र दिनांक २१/०२/२०२५ (संदर्भ-१) अन्वये मार्गदर्शन प्राप्त झाले असून, त्याप्रमाणे आवश्यक कार्यवाही करणेबाबत मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन दुय्यम संवर्ग) नागपूर यांनी संदर्भ-२ अन्वये, या कार्यालयास निर्देश जारी केले आहे.

त्यानुषंगाने, शासन पत्र दिनांक २१/०२/२०२५ व संदर्भीय पत्र क्रमांक-२ च्या पत्राची प्रत यासोबत सहपत्रित केलेली आहे. करीता सर्व नियंत्रण अधिकारी यांनी संदर्भीय पत्रात नमुद केलेले मार्गदर्शन विचारात घेऊन, प्रस्तुत प्रकरणात आवश्यक कार्यवाही करावे.

**सहपत्र :-** वरीलप्रमाणे

**(एस. रमेशकुमार)**
मुख्य वनसंरक्षक (प्रादे.) गडचिरोली

महाराष्ट्र शासन
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय
Email ID : apccfhrmadmn@gmail.com ,वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर 440 001

ई-मेलव्दारे

क्र.कक्ष-१०(२)/आस्था/एक/प्र.क्र.१०८(२४-२५)/१४१५
नागपूर ४४०००१, दिनांक २१/०२/२०२५

प्रति,
मुख्य वनसंरक्षक(प्रादेशिक),
गडचिरोली

**विषय**: एकस्तर वेतननिश्चितीबाबत.
एकस्तर पदोन्नती अंतर्गत वेतननिश्चिती जोडपत्र-III नुसार करण्याबाबत

**संदर्भ** : १. आपलेकडील पत्र क्रमांक कक्ष-१(३)/ आस्था/गड/२०२४-२५/१४०४, दिनांक १७/०२/२०२५
२. या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-१०(२)/आस्था/एक/प्र.क्र.१०८(२४-२५)/ २२२, दिनांक १८/०२/२०२५
३. शासन पत्र क्रमांक एफएसटी-०२/२५/प्रक्र. ३२/फ-४, दिनांक २१/०२/२०२५

प्रस्तुत प्रकरणी दिनांक ०१/०१/२००६ नंतर नियुक्त वनरक्षक यांचे एकस्तर चे वेतन निश्चिती कोणत्या प्रकारे करावी याबाबत मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), गडचिरोली यांनी संदर्भिय पत्र क्रमांक १ अन्वये मार्गदर्शन मागविण्यात आले होते. त्याअनुषंगाने या कार्यालयाचे पत्र संदर्भ २ अन्वये शासनाकडुन मार्गदर्शन मागविण्यात आले होते. यावर शासन पत्र संदर्भ -३ अन्वये मार्गदर्शन प्राप्त झाले आहे. (प्रत संलग्न)

२. तरी संदर्भिय शासन पत्रान्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनाप्रमाणे कार्यवाही करावी, ही विनंती.

सहपत्रः- वरील प्रमाणे

(गिरिजी सिंह)
उप वनसंरक्षक
(मानव संसाधन व्यवस्थापन)
नागपूर

**प्रतिलिपी (ईमेलव्दारे) :-**

१. अपर मुख्य सचिव (वने), महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२. मुख्य वनसंरक्षक(प्रादेशिक) (सर्व)
३. वनसंरक्षक(प्रादेशिक) (सर्व)

महसूल व वन विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
ई-मेल-vinayak.jakhlekar@nic.in

क्रमांक:एफएसटी-०२/२५/प्र.क्र.३२/फ-४

दिनांक:- २१ फेब्रुवारी, २०२५

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग),
महाराष्ट्र राज्य, नागपूर.

विषय:- एकस्तर वेतननिश्चितीबाबत.
एकस्तर पदोन्नती अंतर्गत वेतननिश्चिती जोडपत्र जोडपत्र-III नुसार करण्याबाबत.

संदर्भ:- १) आपले पत्र क्र.कक्ष-१० (२)/आस्था/एक/प्र.क्र.१०८ (२४-२५)/२२२,
दि.१८.०२.२०२५.

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भाधीन पत्रान्वये सहाव्या वेतन आयोगात वनरक्षकांना एकस्तर पदोन्नतीची वेतन निश्चिती करतांना जोडपत्र-III नुसार ग्रेड पे समोरील वेतन निश्चितीप्रमाणे वेतननिश्चिती करता येईल किंवा कसे, तसेच दिनांक ३/२/२०२३ ची अधिसूचना एकस्तर योजनेनुसार वेतननिश्चितीचा लाभ देणेसाठी लागू होईल किंवा कसे, याबाबत मार्गदर्शन करण्याची विनंती केली आहे. त्यानुषंगाने आपणांस खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग अधिसूचना दि.०३.०२.२०२३ रोजीच्या अधिसूचनेतील तरतूद खालीलप्रमाणे आहे.:-

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ मधील नियम ७ च्या पोटनियम (१), पोटकलम (क) नंतर पुढील पोटकलम दाखल करण्यात येत आहे.

(ड) सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार सरळसेवेने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना ज्या पदावर दि.०१.१.२००६ रोजी किंवा त्यानंतर या नियमांच्या जोडपत्र-तीन नुसार सेवाप्रवेश वेतन अनुज्ञेय ठरते, अशा पदांवर दि.०१.०१.२००६ पूर्वी नामनिर्देशनाने अथवा पदोन्नतीने नियुक्त झालेल्या आणि दि.०१.०१.२००६ रोजी पोटनियम (१) कलम (अ) अन्वये वेतननिश्चिती केलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन, सरळसेवा नियुक्तीसाठी जोडपत्र-तीन मध्ये विहित केलेल्या सेवाप्रवेश वेतनापेक्षा कमी निश्चित होत असेल तर, ते दि.०१.०१.२००६ पासून उंचावून देण्यात यावे की, त्यामुळे अशा सेवाप्रवेश वेतनापेक्षा ते कमी असणार नाही.

तसेच नियम १३ मधील (क)

सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार सरळसेवेने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना ज्या पदावर दि.०१.०१.२००६ रोजी किंवा त्यानंतर या नियमांच्या जोडपत्र-३ नुसार सेवाप्रवेश वेतन अनुज्ञेय ठरते, अशा पदावर दि.०१.०१.२००६ रोजी किंवा त्यानंतर पदोन्नतीने नियुक्त झालेल्या आणि पोटनियम (अ) नुसार वेतननिश्चिती केलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन, विहित केलेल्या उक्त सेवाप्रवेश वेतनापेक्षा कमी निश्चित होत असेल तर, ते दि.०१.०१.२००६ रोजी किंवा त्यानंतरच्या त्यांच्या पदोन्नतीच्या दिनांकापासून उंचावून देण्यात यावे की, ज्यामुळे ते अशा सेवाप्रवेश वेतनापेक्षा कमी असणार नाही.

उपरोक्त तरतूद विचारात घेता, एकस्तर पदोन्नती ही प्रत्यक्ष पदोन्नती नसल्याने एकस्तर पदोन्नतीची वेतननिश्चिती करताना संबंधितांना पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी अनुज्ञेय करणे अपेक्षित आहे. त्यामुळे दि.०३.०२.२०२३ मधील तरतुदी लागू होत नसल्याने वनरक्षकांना एकस्तर पदोन्नतीची वेतननिश्चिती करतांना जोडपत्र-III नुसार ग्रेड पे समोरील वेतननिश्चितीप्रमाणे वेतननिश्चिती करता येणार नाही.

२. सदर पत्र वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र.६६/२०२५/सेवा-३, दि.२१.०२.२०२५ अन्वये दिलेल्या अभिप्रायानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

(वि. श. जाखलेकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :- निवड नस्ती (फ-४.